## व्यवसाय / धंधा

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...

दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...

501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २७३ वा | गुरुवार, दि. १२ जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# सर्व रस्ते बंद करणार, सरकारला सळो की पळो करून सोडणार - जरांगे पाटील

## शेतकरी कर्जमाफीचा निर्णय जाहीर झाल्याशिवाय उपोषण थांबवणार नाही - बच्चू कडू

**अमरावती (कटूसत्य वृत्त):-** जात, धर्म, राजकीय पक्ष सर्व बाजूला ठेऊन शेतकरी म्हणून एक झाले पाहिजे तरच या राज्यातला बळीराजा जिवंत राहील असे म्हणत प्रहार जनशक्ती पक्षाचे बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफीसह अन्य १७ मागण्यासाठी बेमुदत अन्नत्याग उपोषण सुरु केले आहे. सध्या कडू यांची प्रकृतीत बिघाड झाला असून शेतकरी कर्जमाफीचा निर्णय जाहीर झाल्याशिवाय उपोषण थांबवणार नाही असा पवित्रा कडू यांनी घेतला आहे.

सलग चार दिवस झाले तरी सरकारकडून कर्जमाफीसह अन्य मागण्या मान्य न झाल्याने राज्यभरात प्रहारचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. टॉवर वर चढून शोले आंदोलन, आमचे कपडे घ्या पण कर्जमाफी द्या आंदोलन, चूल बंद आंदोलन केले जात आहे.

सध्या राज्यभरातून बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे. भारतीय किसान युनियनचे राकेश टिकैत यांनी उपोषणस्थळ मोझरी येथे भेट देत कडू यांना आपला पाठिंबा दिला आहे. शरद पवार यांनीही फोन करून आपले समर्थन दिले आहे. तसेच आमदार रोहित पवार, संभाजीराजे छत्रपती, रविकांत तुपकर, निलेश लंके, राजू शेट्टी आदींनी बच्चू कडू यांच्या उपोषणाला पाठिंबा दिला आहे.





मराठा समाजाचे नेतृव मनोज जरंगे पाटील, पँथर सेनेचे दीपक केदार, भोई समाज यांनी पाठिंबा दिला आहे.

माजी आमदार बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सुरू केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाच्या चौथ्या दिवशी मराठा नेते मनोज जरांगे यांनी उपोषणस्थळी पोहचून बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आणि कडू यांच्याशी चर्चा केली.

मनोज जरांगे म्हणाले, विदर्भ आणि मराठवाड्यात शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या होत आहेत. शेतकरी संकटात आहेत. बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. पण, उपोषण करणे, हे सहजसोपे नसते, हे मी स्वतःच्या अनुभवावरून सांगतो. बच्चू कडू यांनी जीवाची बाजी लावली आहे. त्यांनी अंत्ययात्रा हा शब्द वापरला आहे. हे फार गंभीर आहे. बच्चू कडू यांनी तब्येतीची काळजी घ्यावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्रीद्वय एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी आंदोलनाची तत्काळ दखल घेऊन शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य कराव्यात अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही.

मनोज जरांगे म्हणाले, शेतकऱ्यांच्या या आंदोलनात कुणी मराठा, कुणी ओबीसी नाही. जात आम्ही घरी ठेवून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एकत्र आले पाहिजे. आता सर्व शेतकरी संघटनांच्या नेत्यांनी तातडीने बैठक बोलावून या आंदोलनाला पाठिंबा द्यावा आणि एक दिवस ठरवून संपूर्ण महाराष्ट्र बंदची हाक द्यावी. आम्ही वाहनाचे एकही चाक हलू देणार नाही. निर्णयक्षमता आमच्यात आहे. शेतकऱ्यांच्या लढ्यासाठी आम्ही सर्व जण एकत्र येऊ, पक्ष बाजूला ठेवू. आम्ही सर्व शेतकऱ्यांची मुले आहोत. आता शेतकऱ्यांना न्याय दिल्याशिवाय बाजूला हटणार नाही.

मनोज जरांगे म्हणाले, आता संपूर्ण राज्यात उठाव झाला पाहिजे. बच्चू कडू खमक्या आहे. मी माझी ताकद बच्चू कडूंच्या मागे उभी करण्यास तयार आहे. मागण्या मान्य न झाल्यास आम्ही रस्त्यावर उतरू. मी केवळ भाषणबाजी करीत नाही. मराठा, ओबीसी हा विषय आम्ही या आंदोलनाच्या वेळी बाजूला ठेवला आहे. कुणी इथे जात आणू नये, पक्ष आणू नये. सर्वांनी शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढाई उभारली पाहिजेत.

बच्चू कडू यांनी यावेळी मनोज जरांगे यांचे आभार मानले. कडू म्हणाले, दर दिवशी २० ते २५ शेतकरी आत्महत्या होतात. कष्टाने पिकवलेले सोयाबीन अवघ्या साडेतीन हजार रुपयांमध्ये विकावे लागते, तेव्हा शेतकऱ्यांच्या मनाला किती वेदना होत असतील, हे समजून घ्यायला हवे. यावेळी ज्येष्ठ नेते गिरीश गांधी उपस्थित होते.

## प्रभाग रचना तयार करण्याचे महापालिकेला शासनाचे आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी महापालिका निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून शासनाने राज्यातील 'ड' वर्गाच्या महापालिकांना प्रभाग रचना तयार करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये सोलापूर महापालिकेचा समावेश आहे. प्रत्येक प्रभाग रचना ही चार सदस्यांची असेल.गेल्या तीन वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. याबाबतीत गेल्या महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यात निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. त्या पार्श्वभूमीवर शासनाच्या नगरविकास विभागाने मंगळवारी प्रभाग रचनेचे आदेश काढले आहेत.सोलापूरबरोबरच लातूर, अमरावती,अहिल्यानगर, अकोला, कोल्हापूर, सांगली,मिरज कुपवाड, मीरा-भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी निजामपूर, जळगाव, नांदेड वाघाळा,धुळे, मालेगाव, चंद्रपूर, परभणी, पनवेल,इचलकरंजी आणि जालना या १९ 'ड' वगार्तील महापालिकांना हे आदेश दिले गेले आहेत.या आदेशात प्रभाग रचनेचे टप्पे, जबाबदार अधिकारी आणि मार्गदर्शक तत्त्वे नमूद केली आहेत. केलेल्या अधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी ती सादर करण्यात यावी. प्रारूप प्रभाग रचनेस मान्यता घेऊन ती प्रसिद्ध करावी. या प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी घेण्यात यावी. सुनावणीच्या अहवालासह अंतिम प्रभाग रचना राज्य निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेसाठी सादर करावी. सुनावणीनंतर प्राप्त अहवालानुसार अंतिम प्रभाग रचनेस मान्यता द्यावी.अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करावी. प्रभागांची संख्या ठरवताना शक्यतो सर्व प्रभाग चार सदस्यांचे करावयाचे आहेत. सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन अथवा पाच सदस्यांचा होईल. अथवा दोन प्रभाग तीन सदस्यांचे होतील. असे तीन अथवा पाच सदस्यांचे प्रभाग कोणत्या क्षेत्रात असतील हे भौगोलिक सलगता राखण्याच्या दृष्टीने प्रभाग रचना करताना नागरिकांची गैरसोय टाळता येईल अशा ठिकाणी ठेवण्यात यावेत. याकरिता प्रत्यक्ष प्रभाग रचना करण्याबाबतचे इतर निकष देखील विचारात घ्यावेत. मात्र, अशी कोणतीही परिस्थिती नसल्यास शेवटचे प्रभाग तीन किंवा पाच सदस्यांचे राहतील.महापालिका क्षेत्राचे प्रभाग पाडल्यानंतर प्रत्येक प्रभागातून निवडून द्यावयाच्या **(पान 2 वर..)**

## पुढील ७ दिवस १७ राज्यांत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळणार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सर्वसामान्य आणि शेतकऱ्यांच्या छातीत धडकी भरवणारा अलर्ट भारतीय हवामान खात्यानं दिला आहे. देशातील १७ राज्यांमध्ये ११ ते १७ जून या कालावधीत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळेल, असा इशारा हवामान खात्यानं दिला आहे.



कर्नाटक, आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडू आणि नैऋत्येकडील अनेक राज्यांसाठी पुढील सात दिवसांसाठी हा अलर्ट देण्यात आला आहे.

मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात पूर्वमोसमी पावसानं महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत धुमाकूळ घातला होता. अनेक भागांत पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. अवेळी नकोशा असलेल्या पावसानं सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांना हैराण केलं. यंदा मान्सूनचं आगमन लवकर झालं. आता बरसात होऊन उकाड्यापासून दिलासा मिळेल, या विचारानं सर्वांनीच आकाशात जमा होणाऱ्या **(पान 2 वर..)**



## संपादकीय

# पर्यावरण बदल एक आव्हान

अतिनील किरणांमुळे जागतिक तापमानात बदल होत आहे. बदलत्या हवामानामुळे विविध देशांतील पावसाळ्याचे तसेच उन्हाळ्याचे चित्र बदलले आहे. गेल्या काही वर्षांपासून जागतिक तापमान वाढ हा मुद्दा सातत्याने जागतिक व्यासपीठावर चर्चेत आहे. परंतु संयुक्त राष्ट्रसंघाच्या सरचिटणीस यांनी म्हटल्या प्रमाणे, आता उत्कलनाचा काळ सुरू झाला आहे. औद्योगिक काळाच्या आधीपेक्षा जगाचे तापमान सरासरी 1.2 टक्यांनी वाढलेले आहे. उत्तर गोलार्धात झालेली टोकाची तापमान वाढ, एल निनोसारखे समुद्री प्रवाह, दक्षिण गोलाधार्तील उष्ण पाणी, 2022 मध्ये उसळलेला प्रशांत महासागरातील सागा टोंगा ज्वालामुखी, यामुळे अतिशय शक्तिशाली/विघातक असे ग्रीन हाउस गॅसेस निर्माण झाले. वातावरणातील मिथेनची वाढलेली पातळी, त्याचबरोबर घातक वायूंच्या उत्सर्जनामुळे ओझोन थर विरळ होत आहे. ओझोन हा ऑक्सिजनच्या तीन अणूंचा (ओ3) बनलेला असतो. वातावरणातील ओझोन हा सजीवांचे रक्षण करतो, परंतु हाच वायू जमिनीवर निर्माण झाला तर सजीवांसाठी धोकादायक आहे. म्हणून ओझोनला 'गुड ओझोन' आणि 'बॅड ओझोन' असे संबोधले जाते. दुर्दैवाने वाहनांचा धूर, कोळशाचे ज्वलन यामुळे होर्णाया प्रदुषणामुळे हा वायू जमिनीवर निर्माण होत असून तो धोकादायक ठरत आहे. या वायूचे महत्त्व मानवजातीच्या सर्वप्रथम लक्षात आले ते 1940 साली. 1979 मध्ये शास्त्रज्ञांना आढळले की अंटार्क्टिकावर 194 डोबसन युनिट आणि 1.1 दशलक्ष चौरस किलोमीटर आकाराचे छिद्र पडले आहे. 1987 मध्ये जेव्हा मॉण्ट्रियल करार (प्रोटोकॉल) अमलात येत होता, तेव्हा ओझोन छिद्राचा आकार 22.4 दशलक्ष चौरस किलोमीटर झाला होता. 2006 मध्ये हा आकार वाढून 29.6 दशलक्ष चौरस किलोमीटर झाला. नैसर्गिक पद्धतीने निर्माण होणारा हा प्राणवायू पृथ्वीपासून 10 ते 35 किलोमीटर अंतरावर 90 टक्के इतका आहे. सूर्यप्रकाशामार्फत येणारे हानिकारक अतिनील किरणे तो शोषून घेतो आणि मानवजातीची, वनस्पतीची व जीवसृष्टीची हानी टाळतो.

जागतिक तापमान वाढीवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न बर्याच संस्था करत आहेत. मात्र अजून यावर ठोस असे उपाय करता आलेले नाही. डिसेंबर 2022 मध्ये 122 वर्षातला सर्वात जास्त तापमान असलेला महिना आपण अनुभवला. नंतर फेब्रुवारी 2023 मध्ये 1901 नंतरचा सर्वाधिक तापमान असलेला महिना संपूर्ण जगाने अनुभवला. मानव अथवा निसर्गनिर्मित वातावरणातील बदल काही प्रमाणात दिसायला लागलेत. उष्माघात त्यालाच हिट स्ट्रोक किंवा सन स्ट्रोक असे म्हणतात. ही एक जीवघेणी अवस्था आहे असे डॉक्टर सांगतात.

उष्माघातामुळे महाराष्ट्रात 2022 मध्ये 767 रुग्णांचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. जून 2021 मध्ये कॅनडात रेकॉर्ड ब्रेक उष्णता वाढल्याने अनेकांचा मृत्यू झाला. प्रत्येक राष्ट्र आर्थिक विकास आणि आर्थिक महासत्ता बनण्याच्या चढाओढीत लागला आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर ज्या जागतिक समस्या आहेत त्या समस्यांकडे पाहिजे तितके लक्ष दिले जात नाही. जागतिक स्तरावरील जी20, ब्रिक्स अशा बर्याच संस्था पर्यावरण बदलावर काम करत आहेत. भारतात उष्णतेशी सामना करण्यासाठी 2016 मध्ये 'नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंट ॲथॉरिटी'ने त्यासाठी मार्गदर्शक सूत्रे आखून दिली आहेत. 2013 मध्ये अशा उपाययोजना करणारे अहमदाबाद हे आशिया खंडातील पहिले शहर ठरले.

पण केवळ सरकार आणि संस्थांची ही जबाबदारी नसून प्रत्येक व्यक्तीने ठरवले तर जागतिक तापमान वाढीवर नियंत्रण आणता येऊ शकते. वेळीच जर योग्य पावले उचलली गेली नाहीत, तर जागतिक तापमान वाढीचे परिणाम भयानक असतील, हे संशोधक सांगत आहेत. मात्र त्यावर 'मी एकट्याने हे करून काय होणार?' असा विचार केला जातो. त्यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. असे वाटते की, स्टीफन हॉकिंग यांनी दिलेला इशारा प्रत्यक्षात उतरण्याचे दिवस जवळ आले आहेत. पृथ्वीवरील जीवसृष्टीचा अंत हा निसर्गात केलेल्या मानवाच्या हस्तक्षेपामुळे आणि त्यामुळे वातावरणात झालेले अनिष्ट बदल यामुळे होईल, असे त्यांनी भाकीत केले होते. ज्यातील जगातील स्तरावर सर्वच देशांनी महापूर, दुष्काळ आणि कोविडसारख्या महामारीचा अनुभव घेतला आहे. ही सुरुवात असली तरी मानवी जीवनावरील विघातक परिणाम सुरू होण्यास वेळ लागणार नाही.

कोळसा आणि इंधन तेलाच्या वापरामुळे वातावरणात सोडले जाणारे कर्बवायू तापमान वाढीचे कारण बनतात. त्याचा परिणाम निसर्गचक्रावर होतो. पावसाचे अवेळी येणे. मुसळधार पाऊस पडणे. अचानक वादळ, पूरपरिस्थिती उद्भवणे हे वारंवार जग अनुभवत आहे. भारतातील इंटरनॅशनल काउन्सिल फॉर लोकल एन्व्हायरमेंट इनिशिएटिव्हज संस्थेच्या माध्यमातून केलेल्या सर्वेक्षणातून ही बाब समोर आली की नागपूरमध्ये हरितगृह वायूचे उत्सर्जन वाढत आहे. नागपूरमध्ये दरवर्षी 3.03 दशलक्ष टन कार्बन डायऑक्साइडमुळे प्रचंड तापमान वाढ होईल. त्यामुळे कधीही मुसळधार पाऊस पडण्याची आणि पूरपरिस्थिती उद्भवण्याची शक्यता आहे. जे आपण 23 सप्टेंबर 2023 रोजी पाहिले. नागपूरमध्ये पूरजन्य परिस्थिती ओढवली गेली.

ज्यामध्ये जवळपास 10 हजार घरांचे नुकसान आणि त्याचबरोबर मोठी आर्थिक हानी झाली. या अहवालानुसार भारतातील स्मार्ट शहरांपैकी 15 शहरे अशा मोठ्या पर्यावरणीय समस्यांच्या जाळ्यात येणार आहेत. रसायन, सिमेंट, विद्युत उपकरणांचे कारखाने, कापड, सिरॅमिक्स उद्योग, औषध निर्मिती, अन्नप्रक्रिया, लाकूड आणि कागद उद्योग असणाऱ्या शहराच्या परिसरात तापमान वाढ करणारे हरितगृह वायू मोठ्या प्रमाणात सोडले जातात. या शहरांनी असे वायू वातावरणात सोडण्याच्या कारणांवर नियंत्रण आणणे आणि हे प्रमाण 20 टक्क्यांपेक्षा जास्त घटवणे आवश्यक आहे.

यासाठी याच अहवालामध्ये काही उपाय सूचविण्यात आले आहेत. यातील महत्त्वाचा उपाय म्हणजे शहरांमध्ये विद्युत वाहनांचा वापर करायला हवा. ई-वाहतूक, शक्य त्या सर्व ठिकाणी सायकलचा वापर करायला हवा. कर्चयापासून शास्त्रशुद्ध पद्धतीने खत निर्मिती प्रकल्प उभारायला हवेत. कर्चयातून हरितगृह वायू बाहेर पडणे पूर्णतः थांबायला हवे. पर्यावरणपूरक इमारतींच्या बांधकामास प्रोत्साहन द्यायला हवे. यातील सर्वात महत्त्वाचा भाग आहे तो ई-वाहतुकीसाठी बॅटरीवर चालर्णाया वाहनांची संख्या वाढवणे. मात्र या वाहनांच्या बॅटरीज पुनर्प्रभारित करण्यासाठी वापरली जाणारी ऊर्जा ही कोणत्या ना कोणत्या औष्णिक विद्युत केंद्रात तयार होते. ही ऊर्जा निर्माण करण्यासाठी दगडी कोळसा मोठ्या प्रमाणात वापरला जातो. या कोळशातून हरितगृह वायू वातावरणात सोडला जातो. त्यातून निर्माण होणारी ऊर्जा प्रदूषणमुक्त ऊर्जा कशी देणार? हा प्रश्न निरूत्तरित राहतो. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने ऊर्जेऐवजी जास्तीत जास्त अपारंपरिक ऊर्जा साधनांचा वापर करून ऊर्जा निर्मिती व्हायला हवी. यामध्ये पवन ऊर्जा, सौर ऊर्जा यांचा आधिकाधिक वापर झाल्यास ई-वाहतुकीस अर्थ प्राप्त होईल. विकास आणि महासत्ता बनण्याचे स्वप्न तेव्हाच पूर्ण करता येऊ शकते जेव्हा जगातील/देशातील वातावरण हे आरोग्याच्या दृष्टीने चांगले असेल. आरोग्य चांगले तरच विकासासाठी प्रयत्न करता येतील. तेव्हा आपणच ठरवायला हवे की हा प्रश्न सर्वात महत्त्वाचा आहे आणि त्याकडे आधी लक्ष देणे गरजेचे आहे. यासाठी गरज आहे ती, जनजागृतीच्या माध्यमातून ओझोन थराचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहचवणे.

# महाराष्ट्राला पडलेले एक सुंदर स्वप्न – मा. उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील



झाड वठतं..... फांद्या सुकतात.....कधी मुळं बेईमानी करतात तर कधी खोडंच आधाराचा हात सोडत..... पण म्हणून झाडाला जबाबदारी सोडता येत नाही, त्याला पाखरं जपावीच लागतात.... असंच काही मानवरूपी बघितलेलं एक झाड.....स्वतःच आयुष्य फाटत असताना अनेकांच्या भविष्याला कायम सुवर्ण नक्षीने मडवनारा कर्मयोगी, चेहऱ्यावरील कर्तृत्वाचे तेज, पराकोटीचे सयंमी, सामान्यांबद्दल संवेदनशील मन आणि सहानुभूतीयुक्त अंतःकरण आणि त्यागमय सेवेची जोड मिळाली, की त्या सामान्य माणसामधूनच असामान्य माणसे उभी राहतात त्यातीलच एक नाव म्हणजे महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील. विचार आणि कार्य या दोन्ही माध्यमातून व्यक्त होणारे बहुपरिचीत व्यक्तीमत्व. आजही दादांकडे पाहुन वाटते जीवन असे जगावे. कधीही कुणावर उपहास न करता अजातशत्रू व्यक्तिमत्व टिकवणे ही साधी सोपी गोष्ट नाही. म्हणून जीवन कसे जगावे याचे उत्तर इथेच आहे. प्रत्येक पद लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. माणुसकीला कधीही बाजूला पडू दिले नाही. प्रत्येक क्षण माणसात राहून शाश्वत माणुसकी धमार्ची जपणूक केली. नेहमी चांगले विचार समाजाला देऊन वैचारिक सुदृढता निर्माण केली.

न बुद्धिभेद जनयेदज्ञानां कर्मसन्डिनाम.... जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्यूक्तः समाचरन... गीतेत म्हटले आहे नेता सामाजिक धार्मिक अथवा राजकीय असो त्याने स्वतःच्या जिवंत आचरणाने समाजाला प्रेरक मार्गदर्शन केले पाहिजे. या उक्तीप्रमाणे दादांचे आजही अखंडपणे समाजसेवेचे कार्य चालू आहे. समाज, कार्यकर्ता आणि दुसऱ्यांसाठी जगणारा असा हा माणूस. दादांचे वागणे, बोलणे, राहणे, पोशाख किती साधा. साध्या माणसांचा साधा प्रतिनिधी म्हणजे दादा. १९८० साली ते आमदार झाले. सलग आमदार, खासदार होऊनही दादांनी कधीही 'मला मंत्री करा' असे सांगितले नाही. दादांचा जीव मंत्रीपदात कधीच नव्हता. पण दादांनी अनेक मंत्रीपदे भूषविली. प्रत्येक खात्याला वेगळी स्वतःची ओळख निर्माण केली. दादा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री झाले. अनेक वेळा वेगवेगळ्या खात्याचे मंत्री झाले पण त्यांच्या वागण्या-बोलण्यात कशातही फरक पडला नाही. ते उपमुख्यमंत्री असोत किंवा मंत्री असोत त्यांना भेटायला कोणालाच कधी संकोच वाटला नाही. दादांच्या भोवती माणसे नाहीत, असा कधी दिवस नाही आणि माणसांना भेटून दादा कंटाळले असेही कधी घडले नाही. नवा विचार स्वीकारून, त्या त्या घटनेचा स्वतंत्र विचाराने निर्णय करण्याची वृत्ती. ते बोलतात कमी पण सामान्य माणसाचे प्रत्येक काम एका झटक्यात....

महाराष्ट्राला पडलेलं एक सुंदर स्वप्न. इतिहासाला ज्यांच्या जीवनाची दखल घ्यावी असं वाटेल ते विजयसिंह मोहिते पाटील.

राजकीय नेत्यांबरोरच शैक्षणिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रात दादांनी मित्र म्हणून जमवलेली माणसं तितक्याच तोलामोलाची होती. त्यामूळे सत्ताधारी पक्ष कोणताही असो, 'विजयदादा' हा शब्द त्यांच्यासाठी प्रमाण होऊन जातो. तो प्रत्येकाला आपला वाटतो. खळाळत वाहणाऱ्या शुभ्र झऱ्यासारखे आणि तिरावरल्या सृष्टीला नवसंजीवनी देणाऱ्या निराभिमा नदीच्या शांत प्रवाहासारखे त्यांचे जगणे आहे. माणसांना मानवतेचा सुगंध देणारे आणि श्रमाला प्रतिष्ठेचे तेजोवलय निर्माण करणारे विजयदादा महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षितिजावरचे ज्ञानसुर्य आहेत. समाजाला भाकरी एवढीच विचारांची गरज आहे म्हणून महामानवांच्या विचारांना शिल्पसृष्टीच्या माध्यमातून जिवंत केले. पंढरपूर लोणंद रेल्वे प्रश्न मूर्तीमंत केला. महाराष्ट्रात आठ राष्ट्रीय महामार्गाचे जाळे विणले. हायमास्ट दिव्यांच्या माध्यमातून अनेक गावांना प्रकाशमय केले. खेडूपाडी पिकप शेड, बेघरांना घरकुले, अल्पभूधारकांना जमिनीचे वाटप, सार्वजनिक विहिरी, कालव्यांच्या वितरिका, गुरांसाठी चारा छावणी निर्मिती, सह्याद्री अतिथी गृहाची उभारणी, विस्तारित विधानभवनाची उभारणी, राज्यातील चार पालखी मार्गाचे रुंदीकरण, कलाकारांचा सन्मान, ग्रामीण भागात राज्यस्तरीय मराठी चित्रपट महोत्सव, एलिफंटा केव्हेज इथे समुद्रातील धक्कादुरुस्तीसाठी पाठपुरावा. दादासाहेबांनी केलेली कामे किती सांगावे व लिहावे.

'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' असा महाराष्ट्र दादांनी आपल्या सहकाऱ्यांच्या सोबतीने उभारला व कामे केली. आज १२ जून म्हणजे दादासाहेबांचा जन्म दिवस.. त्यांचे व त्यांच्या कामाच्या आठवणींचे स्मरण करताना काय काय लिहावे, किती लिहावे असे वाटत राहते. विविध क्षेत्रात आणि विविध स्तरावर दादासाहेबांनी केलेलं अफाट काम नजरेसमोर उभे राहते. दिल्ली असो, मुंबई असो अथवा आपलं गांव... दादांचा स्पर्श झाला नाही असे एकही काम नाही. त्यांचा जन्म हा आपला भाग्योदय आहे असं मानणारा मी त्यांचा चाहता आहे... भारताच्या मातीशी व मानवतेशी ऋणानुबंध जोडणारे ते एकलव्य आहेत. आजही उजाडलेल्या नवीन दिवसाकडे नवीन काहीतरी करण्यासाठी त्यांची नजर शोधत असते. म्हणून जीवन कसे जगावे याचे उत्तर इथेच आहे. जीवनाचा खरा अर्थ त्यांच्या कर्तृत्वशील जीवनाकडे पाहिल्यावर कळून येतो. पुन्हा एकदा आपल्या सर्वांचा विठ्ठल म्हणजे दादासाहेब यांना वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा....!!

**प्रा. काटकर तात्यासाहेब शिवाजी**
९२२६१४४८३६ अकलूज.
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

## प्रबोधन

# असा महाराष्ट्र । भविष्या पारखा


संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या काळात अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचा प्रारंभ बहु असोत सुंदर, संपन्न की महा। प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा – ह्या अवीट, श्रवणीय चालीत स्वरबद्ध केलेल्या महाराष्ट्र गीताने व्हायचा. गाण्याच्या शेवटी येणारी देह पडो यत्कारणी ही असे स्पृहा। ही ओळ प्रेक्षागारात टाळ्यांचा कडकडाट आणि अंगांगावर रोमांच उभे करून जायची. तरीही कवी गोविंदाग्रजांच्या मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा – प्रणाम माझा घ्यावा हा श्री महाराष्ट्र देशा। ह्या गीताचं साहित्यमूल्य जसंच्या तसंच राहिलं. याचं कारण गोविंदाग्रजांनी ठेवलेल्या वास्तव जाणिवेत आहे. त्यांनी महाराष्ट्राला राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा असं म्हटलं ते अवास्तव मुळीच नाही. अंजन कांचन करवंदीच्या काटेरी देशा असं म्हटलं तेही व्यंजनेने खरंच आहे. महात्मा चक्रधरांनी गुजरात सोडून महाराष्ट्रात वास्तव्य करणं पसंत केलं. ते म्हणाले, महाराष्ट्र म्हणिजे महंत राष्ट्र। त्यांचे गुरू गोविंदप्रभू रिद्धीपूरचे. म्हणून त्यांनी महाराष्ट्र हे महंतांचं राष्ट्र म्हटलं खरं. पण आपल्या शिष्यांना कोल्हापुरा जाऊ नका असा आदेश त्यांनी दिला; कारण कोल्हापूर हे शक्तिपीठ. तेथील महालक्ष्मी ही शाक्तांची देवी. ते अमावस्येच्या मध्यरात्री तिची पंच'म'कारयुक्त पूजा करीत; आणि शाक्तांच्या पूजाविधानातील मद्य, मांस, मैथुन ही महानुभावांना वर्ज्य होती. पण शक्तिपीठ कोल्हापूर हे महाराष्ट्रात आहे, हे चक्रधरांना माहीत नसावं. त्यांच्या हत्येचा सूत्रधार हेमाडपंत हा देवगिरीच्या यादवांचा प्रधान होता आणि देवगिरीसुद्धा महंतराष्ट्राचाच एक भाग होतं.

म्हणूनच महाराष्ट्राची संस्कृती असा जिचा उल्लेख केला जातो, तिच्याविषयी थोर गांधीवादी, बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंत काय म्हणतात, ते लक्षात घेणं आवश्यक आहे. ते म्हणतात, 'महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने काही गोष्टी खुलेपणाने बोलल्या पाहिजेत. महाराष्ट्राची म्हणून काही संस्कृती आहे का, या प्रश्नाचं उत्तर विचारवंत देतील, असं मला वाटत नाही. सारा महाराष्ट्र एक ही कल्पना पूर्वी तरी अस्तित्वात होती का? आणि आता तरी ती आहे का? आपण महाराष्ट्रीय म्हणजे कोण ? आपली एकता कशात आहे? हा मोठा यक्षप्रश्न आहे. देश व्यापक, लोक विखुरलेले व संस्कृती म्हणजे भिन्नभिन्न विचारांची, आचारांची गोधडी. अशा स्थितीत महाराष्ट्रसमाज एकजिनसी बनला नाही. पूर्वीही लोक तुटकच राहिले व आजही तुटकच राहात आहेत. ज्ञानेश्वरांच्या ग्रंथात आदर्श चातुर्वर्ण्याचा शाब्दिक गौरव आहे; परंतु त्यांचं जिवंत प्रतिबिंब तत्कालीन ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्यात सापडत नाही. चातुर्वर्ण्यातील सर्व परंपरा भ्रष्ट झाल्या आहेत. खुद्द ज्ञानेश्वरांनीही ही प्रक्रिया जिवंत करण्याचा प्रयत्न केला नाही. पैठणच्या ब्राह्मणांना मी कर्माने ब्राह्मण आहे असं त्यांनी खडसावून सांगितलं असतं, तर महाराष्ट्राचा इतिहास निराळा झाला असता.

महाराष्ट्र देहाने एक; पण मनाने शतखंड झाला आहे. महाराष्ट्र पुरोगामी आहे असं म्हणावं, तर आज सर्वत्र प्रतिगामित्व वरचढ झालेलं दिसत आहे. लोक धर्मांध पक्षांना धुत्कारताना दिसत नाहीत. यात्रा, उरूस, देवदेवस्की यात मोठी जनसंख्या सहभागी होते. टिळे संप्रदाय, अष्टगंध आणि शेंड्या अधिकच उगवताहेत. खैरलांजीसारखी प्रकरणं सुबुद्धांना लाज आणताहेत. तरीही निर्मलग्राम पुरस्कार महाराष्ट्र पटकावतो. इतर राज्यांच्या मानाने तरी महाराष्ट्र बराच असं म्हणावं लागतं.

महाराष्ट्राला आपलं पुरोगामित्व सिद्ध करण्यासाठी व्यसनमुक्तग्राम, रोगमुक्तग्राम, पूर्णशिक्षितग्राम, उद्यमशीलग्राम आणि एकात्मग्राम असे अनेक पुरस्कार प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. जातिधर्म, देवीदेवता यांच्या विळख्यातून जेव्हा ग्रामवासीच नव्हे; तर स्वतः सुशिक्षित, सुसंस्कृत म्हणवणारे शहरवासीही मुक्त होतील, तेव्हाच महाराष्ट्र खऱ्या अर्थाने पुरोगामी होईल. कारण–

जातिधर्मामध्ये। देश विभागला
द्वेष-मत्सराला उतू आले ॥ १
हुशार जातींना । कळले स्वहित
पडली तुपात । त्यांची पोळी ॥२
अडाणी जातीत जुंपली भांडणे
लाभ झाला त्याने । लबाडांचा ॥३
हात पराक्रमी । मेंदूने अशक्त
जातीला त्या सुख। कधी नाही ॥४
असा महाराष्ट्र । भविष्या पारखा
फुटल्यासारखा। सांधलेला ॥५
सारे म्हणेनात। माझा महाराष्ट्र
गुंतले स्वार्थात। धन्य त्यांची ॥ ६
कष्टाने, बुद्धीने। महाराष्ट्र नवा
आता जन्मा यावा । हीच इच्छा ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## प्रबोधन

# भविष्याची सत्ता । मान्य करा

वृक्षवल्ली आम्हां वनचरे । पक्षीही सुचली आम्ही नाही अनंग लिहिणाऱ्या संत तुकारामांच्या निसर्गभक्तीची ५ जून या पर्यावरण दिनी अनेक ठिकाणी उजळणी झाली असेल. पर्यावरण रक्षण हेच जीवन आणि पर्यावरणाचा नाश हाच मृत्यू, हे तत्त्व प्रत्येक पृथ्वीनिवासी माणसाच्या मनावर बिंबवण्याची आज तीव्र गरज आहे.

पर्यावरण दिनाकडे आज आपण गंभीरपणे पाहात आहोत, याचा अर्थ पर्यावरणाचा किती नाश आपण केला हेच स्पष्ट होतं. माणूस हा बुद्धिमान प्राणी आहे; पण तो तितकाच मूर्खही आहे, असं जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आइनस्टाइन म्हणायचे. आइनस्टाइन म्हणतात, 'जगात दोन गोष्टी अनंत आहेत. पहिली गोष्ट म्हणजे, विश्व आणि दुसरी, माणसाचा मूर्खपणा. त्यातही पहिल्याविषयी मी खात्री देऊ शकत नाही, पण दुसऱ्याविषयी माझी खात्री पटलेली आहे.'

पर्यावरणाच्या नाशाला केवळ भारतातीलच नव्हे; तर साऱ्या जगातील माणसं जबाबदार आहेत. आपण पर्यावरणाचा नाश करताना आपल्याच पायांवर कुऱ्हाड मारून घेत आहोत, हे त्यांच्या लक्षात येऊ नये, हा त्यांचा अगाध मूर्खपणा आहे. प्राचार्य शिवाजीराव भोसले याविषयीची खंत व्यक्त करताना म्हणतात, 'सुविधांचा विकास, माणसांचा ऱ्हास आणि पर्यावरणाचा विनाश असा जीवन विपर्यास घडता कामा नये.' त्यातूनही जे देश अविकसित किंवा विकसनशील अशा वर्गीकरणात येतात, तेथील जनजीवन निसगार्चा, पर्यावरणाचा गळा घोटणारंच आहे.

पर्यावरण दिन साजरा करण्याची ही नामुष्की जगावर का ओढवली आहे? कारण माणसं स्वार्थी आहेत. लबाड आहेत; दूरदृष्टीची नाहीत आणि मानवतावादी नाहीत. हे जग म्हणजे माझी एकट्याची जहागीर आहे. मी मन मानेल तसा ह्या निसर्गाचा उपभोग घेईन, अशा बेलगाम वृत्तीतून माणूस पर्यावरणाच्या नाशाला उद्युक्त होतो.

पर्यावरणरक्षण ही सामाजिक जबाबदारी आहे. पण ही जबाबदारी आपण का पार पाडू शकत नाही, त्याचं कारण नेमक्या शब्दांत कवी मंगेश पाडगावकर उदासबोधमध्ये सांगतात, खाटीक राजकारणात आले। खाटीक अर्थकारणात आले। खाटीक धर्मकारणात आले। आनंद सारा। पर्यावरणाच्या रक्षणाला अशा खाटीकखान्यात त्राता भेटणं अवघड आहे. हे खाटीक पृथ्वीतलावरील आणि भूगभार्तील साधनसंपत्ती ओरबाडून घेतात. अजस्र कारखान्यांद्वारे वायू, जल आणि माती प्रदूषित करतात. घातक रसायनांनी भरलेली जहाजं मागास देशाच्या समुद्रावर रिकामी होतात. अण्वस्त्रांच्या चाचण्यांनी वातावरणातील ओझोनसारख्या संरक्षण कवचाला छेदतात. आपल्या तिजोरीत किती भर पडली याच उन्मादात जे पुढारलेले देश, जी स्वार्थांध उद्योजक माणसं दंग आहेत, ती जनजीवनाचा, पर्यावरणनाशाचा विचार कशाला करतील?

मात्र जेथे उत्तम प्रशासक आहेत ते देश आपल्या उदाहरणाने जगापुढे उत्तम आदर्श निर्माण करीत आहेत. सिंगापूर हे या दृष्टीने आदर्श प्रजासत्ताक आहे. वृक्षमित्र जगात पुष्कळ आहेत, पण सिंगापूर प्रजासत्ताकाने याबाबतीत केलेली कामगिरी अनुकरणीय आहे. पण त्याचबरोबर जल, वायू, जमीन या घटकांचं आरोग्य हा अवाढव्य कार्यक्रम आहे, हेही लक्षात घेतलं पाहिजे. आज समुद्राच्या पाण्यात साठलेलं प्लास्टिक आणि मिसळणारं सांडपाणी जलचरांचा घात करीत आहे. जगातील ७० टक्के लोकांना समुद्र अन्न पुरवतो. जलचरांचा नाश हा भविष्यकाळी मानवी कुपोषणाचं कारण ठरणार आहे. ही बाब लक्षात घेऊन आता सुधारलेले देश इको फ्रेंडली उत्पादनं करीत आहेत. वीजनिर्मितीला सौरऊर्जेची उत्पादनं मदत करतील, सौरऊर्जेवर किंवा विद्युतशक्तीवर चालणाऱ्या दुचाकी, चारचाकी प्रदूषणमुक्ती साधतील. फ्रीज, टीव्ही, वॉशिंग मशिन्स यांची इको फ्रेंडली रेंज आज बाजारात उपलब्ध आहे. मुलांची खेळणी पुनर्उत्पाद्य घटकांपासून बनवली जात आहेत. इको फ्रेंडली वह्या आणि बल्ब बाजारात आले आहेत. शासकीय पातळीवर वनराई आणि ग्रामवन योजना मूळ धरताहेत. जगाची ही योग्य दिशेने होणारी वाटचाल संतोषजनक आहे, पण तिची गती वाढली पाहिजे. आपल्या देशात मात्र धर्मांध माणसं मूर्ती विसर्जनाचा कार्यक्रम करून जलप्रदूषित करण्यामध्ये धन्यता मानताहेत. निर्माल्य टाकून जलप्रदूषणाद्वारे सामाजिक घात करीत आहेत. उत्सवकाळात ध्वनिप्रदूषणाने आबालवृद्धांचा जीव घेत आहेत. गंगेच्या काठी प्रेतदहनाचं अर्धवट काम उरकून ती प्रेतं नदीत ढकलून देत आहेत. तीर्थक्षेत्रातील उत्सवकाळातील अस्वच्छता पर्यावरणाचा सत्यानाश करीत आहे. म्हणून खाटीक धर्मकारणात आले, असं या धर्मांधांचं वर्णन मंगेश पाडगावकरांनी केलं आहे. एकूण पर्यावरणाची चिंता करावी, अशीच स्थिती आहे. पण मादाम मेरी क्यूरी म्हणतात, 'जीवनात घाबरण्यासारखं काहीच नसतं. वैज्ञानिक शोधांमुळे बरंच कळून येत आहे आणि जीवनविषयक भीती कमी होत आहे. विज्ञानाचं बळ लाभून पर्यावरणाचा ढळणारा तोल सावरला जाईल, हे नक्की.' मेरी क्यूरी यांचं हे विधान सत्यात उतरवण्यासाठी लक्षात असू द्या–

करा संगोपन । वृक्षवल्लरींचे
गुदमरणे जगाचे । दूर व्हावे ॥१
ध्वनि-प्रदूषण । जलप्रदूषण
टाळा पर्यावरण । सुधाराया ॥२
पाणी शुद्ध ठेवा । नद्या-समुद्रांचे
भान भविष्याचे । राखूनिया ॥ ३
निसगार्चा तोल । ढळू देऊ नका
भविष्यात धोका । होऊ नये ॥४
शोषखड्डयांमध्ये । सोडा सांडपाणी
दुर्गंधींपासूनी । राहा दूर ॥५
जनजीवनाचे । रक्षण हा धर्म
बाकी तो अधर्म । प्रथारूढी ॥६
उद्याच्या जगाची । आज करा चिंता
भविष्याची सत्ता। मान्य करा ॥७
पर्यावरणाचा । विचार तो श्रेष्ठ
अन्य ते कनिष्ठ । फंद सारे ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

# पुढील ७ दिवस १७ राज्यांत...

गडद ढगांकडे चातकासारखे डोळे लावले होते. पण पावसानंही पाठ फिरवली. त्यामुळं पदरी निराशाच पडली. अनेक भागात शेतीची कामंही रखडली आहेत. पावसाच्या हलक्या सरी कोसळून दिलासा मिळेल, असं अपेक्षित आहे. मात्र, हवामान खात्यानं पावसाबाबत दिलेल्या ताज्या अलर्टनं सगळ्यांचीच झोप उडाली आहे.

मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात धुमाकूळ घालणारा पाऊस जूनचा दुसरा आठवडा संपत आला तरी हवा तसा पडला नाही. मात्र, पुढील आठवडा अत्यंत महत्वाचा आहे. देशातील १७ राज्यांना हवामान खात्यानं अलर्ट दिला आहे. या १७ राज्यांमध्ये पुढील आठवडाभर मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. काही ठिकाणी गारपीट आणि वादळी वाऱ्याचाही इशारा दिला आहे.

केरळमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळं हवामान खात्यानं तेथील स्थानिक प्रशासनाला सतर्क राहण्यास सांगितले आहे. जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता असून सज्ज राहण्याच्या सूचनाही केल्या आहेत.

उत्तर प्रदेश, बिहार आणि झारखंडसह उत्तरेकडील, तसेच नैऋत्येकडील काही राज्यांत वादळी वाऱ्यांसह गारपीटीचाही इशारा दिला आहे.

# प्रभाग रचना तयार करण्याचे महापालिकेला...

सदस्य संख्येनुसार प्रभागातील जागांना प्रभागाच्या अनुक्रमांक असे यथास्थिती 'अ' 'ब' 'क' 'ड' 'ई' असे संबोधण्यात यावे. सुरुवातीला महापालिका आयुक्तांनी प्रारूपप्रभाग रचना तयार करून जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावी. त्यानंतर राज्य प्रभाग रचना करताना महापालिकेची निवडणूक आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत एकूण लोकसंख्या भागिले महापालिकेची एकूण सदस्यसंख्या गुणिले संबंधित प्रभागातून निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या या सूत्रानुसार एका प्रभागात समाविष्ट करावयाची सरासरी लोकसंख्या निश्चित करावी.

प्रभागाची लोकसंख्या त्या प्रभागाच्या सरासरी लोकसंख्येच्या दहा टक्के कमी किंवा दहा टक्के जास्त या मर्यादित ठेवता येईल. एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत प्रभागाची लोकसंख्या या किमान किंवा कमाल मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त असल्यास त्याचे कारण प्रभाग रचनेच्या प्रस्तावात नमूद करणे आवश्यक राहील.प्रभाग रचना सुरू करताना सर्वप्रथम उत्तर दिशेकडून सुरुवात करावी. उत्तरेकडून ईशान्य(उत्तर पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वे कडून पश्चिमेकडे प्रभाग रचना करत सरकावे व शेवट दक्षिणेत करावा. प्रभागांना क्रमांकही त्याच पद्धतीने द्यावेत. प्रभाग रचना करताना भौगोलिक सलगता राहील याची काळजी घ्यावी. प्रभागाच्या सीमारेषा मोठे रस्ते, गल्ल्या,नद्या, नाले, डोंगर, रस्ते, रेल्वे रूळ, उड्डाणपूल इत्यादी नैसर्गिक मयार्दा विचारात घेऊन निश्चित करावी. कोणत्याही परिस्थितीत एका इमारतीचे,चाळीचे, घराचे विभाजन दोन प्रभागांमध्ये होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मोकळ्या जागांसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या प्रभागात आल्याच पाहिजेत.प्रभाग रचनेच्या बाबतीत कोणासही शंका घेण्यास वाव राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. सीमेचे वर्णन करताना रस्ते, रेल्वे, नाले, नद्या, सिटी सर्व्हे नंबर यांचे उल्लेख प्रामुख्याने यावयास हवे अशा सूचना शासनाने महापालिका आयुक्तांना केल्या आहेत.

## वात्रटिका

### आर्थिक कणा

निधी कमी पडू लागला
वाढला पाहिजे महसूल...
तळीराम म्हणाले आमच्या
कडून करता का मग वसूल... ?
विदेशी बरोबर देशीची
पण यांनी बेसुमार वाढवली...
प्यायच्या आधीच वाढ ऐकून
तळीरामांना चढली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# मारहाण करत पैसे लुटणाऱ्यांना करमाळा पोलिसांनी केली अटक

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** कमी किंमतीत सोन्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीस मारहाण करून त्याच्याकडील रोख रक्कम दीड लाख रु. चोरून घेऊन जाणाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वर शामराव टेकाळे वय ३५वर्षे व्यवसाय-मजुरी, मुळ रा.विखलठाणा, जि.संभाजीनगर (सध्या रा. राहुरी जि.अहिल्यानगर) यांची चार महिन्यापूर्वी मांढरदेवी (ता.वाई) येथे देवदर्शन करीत असताना सविता छगन शंदे रा. निमगाव ह, (ता.करमाळा, जि.सोलापूर) हिच्या सोबत ओळख झाली व तिने फियार्दीस माज्याकडे अर्धा किलो सोने आहे. मला शेतीच्या कामासाठी पैशाची गरज आहे व मी ते सोने कमी भावात विकणार आहे, असे म्हणून फियार्दी ज्ञानेश्वर टेकाळे याचा विश्वास संपादन केला व दिनांक २९/०५/ २०२५ रोजी फियार्दी व त्याचा मित्र सतिश काळे यांना करमाळा बस स्टॅन्ड येथे बोलावून त्या ठिकाणी सविता छगन शिंदे व छगन बिरक्या शिंदे (दोन्ही आरोपी) यानी एक खरी सोन्याची अंगटी व नथ दाखविली ती नथ व



नागरिकांना आवाहन नागरिकांना असे आवाहन करण्यात येते की, स्वस्त सोने मिळणे असा कोणताही प्रकार नसतो ते केवळ आमिष आहे. तरी सदरच्या अशा आमिषाला कोणीही बळी पडू नये तसेच असे काही प्रकार आढळल्यास पोलीस ठाणेशी संपर्क करावा. **- रणजित माने,** पोलीस निरीक्षक, करमाळा

अंगटी सोन्याची असल्याची खात्री झाल्याने फिर्यादी व त्याचा मित्र सतिश काळे यांनी कमी पैशात सोने मिळत असल्याने 150000/- रुपए पैशांची जमवाजमव केली व त्यांनी सोने घेण्याकरीता सविता शिंदे,ज्ञानेश्वर शिंदे यांच्याशी संपर्क केला,

दिनांक १०/०६/२०२५ रोजी यातील फिर्यादी व त्याचा मित्र सतिश काळे असे करमाळा येथे आले असता, सदर आरोपीतांनी फिर्यादीस सोने आमच्या घरी आहे, आमच्या घरी चला असे म्हणुन दुपारी १२/०० वाजणाच्या सुमारास मोटार सायकल सह आरोपीच्या सोबत सोने घेण्याकरीता पांडे गावाच्या शिवारात वनविभागात नेले. व आरोपी सविता छगन शिंदे, छगन बिरक्या शिंदे, ज्ञानेश्वर छ्गन शिंदे, संतोष दिलीप शिंदे यानी फियार्दीस सोने न देता पैशाची मागणी करून शिवीगाळी करून लाथाबुक्यांनी माऱ्हाण केली त्याच वेळी आरोपी ज्ञानेश्वर छगन शंदे याने त्याच्या खिशातील चाकू कादून फिर्यादीस मारण्याची धमकी देवून १५००००/- रुपए सोने न देता जबरीने कादून घेतले.

सदर फिर्यादी करमाळा पोलीस ठाणे येथे दाखल होताच करमाळा पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी रणजीत माने यांनी सदर घटनेचे गंभीर्य ओळखून लागलीस उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील यांना व वरिष्ठांना माहिती देवून त्याचे मार्गदर्शन घेवून तात्काळ पोलीस ठाणेकडील कर्मचारी व अधिकारी त्यामध्ये सपोनि रोहित शंदे, पोहेकॉ/ विलास भराटे, पोहेकॉ अजित उबाळे, पोना मनिष पवार, पोकॉ योगेश येवले, पोकॉ मिलिंद दहिहांडे, पोकॉ अर्जुन गोसावी, पोकॉ अमोल रंदिल, पोकॉ विराज गटकुळ पोकॉ हरिदास निमगिरे, पोकॉ रमेश फुगे यांची टिम तयार करुन गुन्हयांची उकल करण्याकरीता योग्यत्या सुचना देवून अवध्या १२ तासातच आरोपी छगन बिरक्या शिंदे, ज्ञानेश्वर छ्गन शिंदे, संतोष दिलीप शंदे यांना ताब्यात घेवून त्याच्याकडे चौकशी केली असता त्यानी गुन्हा केल्याची कबुली दिली असून १५००००/रु रोख रक्कम, व एक मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे. सदरचा गुन्हयात त्यांना अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा तपास सपोनि रोहित शिंदे करीत आहेत.

सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि रणजीत माने, सपोनि रोहित शिंदे, सपोफौ विश्वास शिनगारे, पोहेकॉ नागेश नाईकनवरे, पोहेकॉ आप्पासाहेब लोहार, पोहेकॉ अजित उबाळे, पोहेकॉ विलास भराटे, पोना मनिष पवार, पोकॉ योगेश येवले, पोकॉ मिलिंद दहिहंडे, पोकॉ अर्जुन गोसावी, पोकॉ अमोल रंदिल, पोकॉ रविराज गटकुळ, पोकॉ हरिदास निमगिरे, पोकॉ रमेश फुगे, मपोकॉ शितल पवार, पोकॉ धनाजी रामगुडे यांनी केली आहे.

**ड्रापचा प्रकार म्हणजे काय**

काही विशिष्ट समाजाचे लोक इतर ठीकाणाचे लोकांना विश्वासात घेवून ओळखी करून त्यांना आमच्या कडे स्वस्तात सोने असून कमी बाजार भावा पेक्षा दरात देतो असे सांगून काही खरे सोने दाखवून इतर सोने खरेदीसाठी दुस-या ठिकाणी बोलावून घेवून त्यांना शेतात, फॉरेस्टमध्ये नेउन मारहाण करून चाकूचा धाक दाखवून सोने न देता फसवणुक करुन मारहाण करुन पैसे घेवून जातात. याला ड्रॉप असे म्हणतात.

# साऊथ आफ्रिकेतील मॅरेथॉनमध्ये सोलापूरचे पोलीस अमंलदार लगमण्णा माळी यांना मेडल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर येथील पोलीस अमंलदार पोह/ २५१ लगमण्णा कलप्पा माळी हे पोलीस आयुक्तालय, मोटार परिवहन विभाग मध्ये कार्यरत असून सध्या ते मा. पोलीस आयुक्त सो यांचे वाहनावर चालक म्हणून कार्यरत आहेत.



पोलीस अमंलदार माळी हे दिनांक ०४ जून ते ०९ जून २०२५ या दरम्यान साऊथ आफ्रिका येथे पीटर्समेरीबर्ग ते डर्बन या दोन शहरा दरम्यान कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉन ९० किलोमीटर अंतर पार करण्याची स्पर्धा आयोजित केली होती. सदर स्पर्धा बारा तासात पूर्ण करण्याचा कालावधी होता परंतु पोलीस अमंलदार माळी यांनी ०८ जून २०२५ रोजी हे अंतर आठ तास सत्तेचाळीस मिनीटामध्ये यशस्वीरित्या पुर्ण केले.

पोलीस अमंलदार यांनी या स्पर्धेला जाण्यासाठी सुमारे पाच महिन्यापासून तयारी सुरू केली होती तयारी करण्यासाठी शिवस्परित कोच, सातारा यांच्याकडून ऑनलाईन ट्रेनिग घेऊन हा सदरचा सराव पुर्ण करून सदर स्पर्धेमध्ये बिल रोहन मेडल हे पदक मिळवले आहे.

तसेच पोलीस अंमलदार माळी यांनी १५ ऑगस्ट २०२३ रोजी ७६ किलोमीटर आजादी रन व सन २०२४ ला ७७ किलोमीटर तसेच २०२३ मध्ये ट्रायथलॉन (हाफ आयर्नमॅन) व हाफ मॅरेथॉन असे भरपूर आजपर्यंत स्पर्धा करून स्पर्धेमध्ये विशेष प्राविण्य मिळविले आहे.

तसेच मा. पोलीस आयुक्त सो एम. राजकुमार यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अमंलदार माळी यांनी कठोर सराव करून सदरची स्पर्धा यशस्वीरित्या पुर्ण केली आहे.

सदर वेळी पोलीस आयुक्तालयाचे वतीने एम. राजकुमार पोलीस आयुक्त, अजित बोऱ्हाडे, पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय), विजय कबाडे पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), डॉ दिपाली काळे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा) यांनी हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री, तथा पालकमंत्री जयकुमार गोरे हे गुरूवार दि. 12 जून 2025 रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.



गुरूवार सकाळी 6.50 वा. सोलापूर रेल्वेस्थानक येथे आगमन व मोटारीने शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. सकाळी 7.05 वा. शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव . सकाळी 10.45 वा. शासकीय विश्रामगृह येथून हॉटेल बालाजी सरोवर प्रीमिअर कडे प्रयाण. सकाळी 10.55 हॉटेल बालाजी सरोवर प्रीमिअर येथे आगमन व 11.00 वा. विकसित भारताचा अमृतकाल संदर्भात पत्रकार परिषदेस उपस्थिती. त्यानंतर सकाळी 11.30 वा भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष (ग्रामिण व शहर) व जिल्ह्यातील सर्व भाजपा मंडल अध्यक्ष यांचे समवेत बैठकीस उपस्थिती.

दुपारी 12.45 वा. सोलापूर येथून पंढरपूर कडे प्रयाण. दुपारी 02.00 वा. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर देवस्थान समिती सभागृह, पंढरपूर येथे आगमन व श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर देवस्थान समिती यांचे समवेत आषाढीवारीच्या अनुषंगाने बैठकीस उपस्थिती. दुपारी 02.45 वा. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर देवस्थान समिती सभागृह येथून शासकीय विश्रामगृह पंढरपूर कडे प्रयाण. 03.00 वा.शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव व नंतर सोयीनुसार बोराटवाडी जिल्हा सातारा कडे प्रयाण करतील.

# 26 लाख रुपये किंमतीच्या गांजासह आरोपी पोलीस जाळ्यात

## अकलूज पोलिसांची दमदार कामगिरी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील,महाळुंग येथील राजू महादेव काळुंखे याच्या घरी,अकलूज पोलिसांनी छापा घातला असता, सुमारे 26 लाख रुपये किंमतीचा, आठ गोणी गांजा मिळून आला असल्याची माहिती अकलूज पोलीस ठाणे कडून देण्यात आली.

अकलूज पोलिसांनी दिलेल्या सविस्तर माहितीनुसार,दिनांक १०/०६/२०२५ रोजी गोपनीय बातमीदारामार्फत, इसम नामे राजु महादेव काळुंखे रा. डांगेस्ती, उजनी कॅनॉलजवळ महाळुंग ता. माळशिरस याने, त्याचे घरी गांजा हा अंमली पदार्थ विक्रीसाठी साठा करुन ठेवलेला आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने, सदरची माहिती लागलीच अकलूज पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी स. पो. नि. साळुखे यांनी वरिष्ठ अधिकारी यांना कळवून, शासकिय पंच, वजन काटा धारक, फोटोग्राफर व सहा. निबंधक (सक्षम अधिकारी), पोलीस अधिकारी व अंमलदार असे पोलीस स्टाफ पोलीस ठाणेकडील दोन्ही शासकिय वाहने व छापा कारवाई करीता आणलेले खाजगी वाहनासह डांगेवस्ती, उजनी कॅनॉलजवळ महाळुंग ता. माळशिरस येथे इसम नामे राजु महादेव काळुंखे याचे घरात प्रवेश करून शोध घेतला असता, घरामध्ये चार वेगवेगळ्या गोण्यात व घराचे बाहेरील बाजुस एका गोणीमध्ये खाकी रंगाचे कागदामध्ये प्लस्टिकचे चिकट टेपने गुडालेले पुडे (पाऊच) दिसुन आले. त्यामधील काही पुढे (पाऊच) फोडून पाहिले असता आतमध्ये गांजा या वनस्पतीची हिरवट रंगाची पाने, फुले, काड्या व बोंडे असा उग्र वासाचा अंमली



पदार्थ असलेबाबत दिसुन आले. सदर गांजा हा अंमली पदार्थ मुद्देमाल ०८ गोणीसह एकुण वजन १२९.४२६ कि. ग्रॅ. एकुण किंमत २५,६८.३४०रुपये चा मिळून आल्याने आरोपी १) राजु महादेव काळुंखे रा. डांगेवस्ती, उजनी कॅनॉलजवळ, महाळुंग ता. माळशिरस, २) आनंद भगवान भिसे रा. महादेवनगर, अकलूज ता. माळशिरस यांचेविरुध्द गुंगीकारक औषधे द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (सी), २२ (सी) व २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधिक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, अकलुज विभाग अकलुज नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक विक्रम साळुंखे, स. पो. नि. योगेश लंगुटे, स.पो.नि. गणेश चौधरी, पोलीस उपनिरीक्षक सुधीर खारगे, महिला पोलीस उपनिरीक्षक करिष्मा वणवे, पोलीस हवालदार सुहास क्षिरसागर, शिवकुमार मदभावी, विक्रम घाटगे, किशोर गायकवाड, अजय बुरले, सोमनाथ माने, मोहन मस्के, रणजित जगताप, प्रविण हिंगणगावकर, चालक महादेव जाधव, शरद आगलावे यांनी कामगिरी केली आहे. सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक विक्रम साळुंखे हे करीत आहेत.

# पंढरपूर उप माहिती कार्यालयातील रद्दी विक्री बाबत आवाहन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर अधिनस्त उप-माहिती कार्यालय पंढरपूर या कार्यालयातील मराठी दैनिके, साप्ताहिके तसेच इतर किरकोळ जमा झालेली रद्दी विक्री करावयाची आहे. त्यासाठी जिल्ह्यातील विक्रेत्यांकडून दर पत्रके मागविण्यात येत आहेत. तरी ज्यांना वृत्तपत्राची रद्दी घ्यावयाची आहे. त्यांनी आपली दरपत्रके 17 जून 2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत बंद लिफाफ्यात द्यावीत. लिफाफ्यावर रद्दी दर पत्रके असा उल्लेख असावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा स्वीकार केला जाणार नाही असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

दरपत्रके पाठविण्यासाठी कार्यालयाचा पत्ता- जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,तळमजला, क विभाग जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर-413001 तसेच उप-माहिती कार्यालय, भक्ती मार्ग, पत्रकार नगर, कनकाक्षर बंगला, हॉटेल दुर्वाकर शेजारी पंढरपूर ता.पंढरपूर. जि.सोलापूर. कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक 0217-2731040, 2731041 व 02186- 295914 असा आहे.

**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१
**सार्वजनिक आरोग्य अभियंता (जलवितरण विभाग)** smcphewtr@gmail.com

**आठवी मुदतवाढ**

सोलापूर म.न.पा.चे विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ कडील प्रभागातील दुषित पाणी पुरवठा सुधारणे कामी नव्याने पाईप लाईन टाकणेकरीता लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वसती सुधारणा योजना सन २०२५-२६ अंतर्गत कामाचे ई-निविदेस खालीलप्रमाणे आठवी मुदतवाढ देण्यात आली आहे.

1)Tender ID-2025-SMC-1171591_1, 2)Tender ID-2025-SMC-1171434_1, 3)Tender ID-2025-SMC-1171604_1, 4)Tender ID-2025-SMC-1171637_1, 5)Tender ID-2025-SMC-1171653_1

या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.१२/०६/२०२५ रोजी सकाळी १०.०० पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**प्र.सार्वजनिक आरोग्य अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

# नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये रंगला चिमुकल्यांचा प्रवेशोत्सव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरातील शैक्षणिक वतुर्ळात वेगळा ठसा उमटविलेल्या नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये ९ जून 'विद्यारंभ दिन' मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा सौ. वर्षा विभूते, विश्वस्त नंदिनी करजगी, मोहिनी करजगी, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, शाळेच्या मार्गदर्शिका सौ. मीना पारखे, प्राचार्या सौ. रुपाली हजारे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

सर्वप्रथम विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबपुष्प देऊन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कै. नागेश (आण्णा) करजगी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. उन्हाळ्याच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर शाळेची पहिली घंटा वाजली. प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नवा डबा, नवे दप्तर, वह्या, पुस्तकांची नवलाई असताना आपल्या मित्रमंडळींना भेटण्याची उत्सुकता होती तर दुसरीकडे पूर्व प्राथमिक विभागातील चिमुरड्यांनी पहिल्यांदाच पालकांसमवेत शाळेत पहिले पाऊल टाकले. नव्याची नवलाई असली तरी सारेच काही अनोळखी असल्याने त्यांच्याकडून आई-वडिलांना काही सोडवत नव्हते. शाळेचा परिसर विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने गजबजून गेला होता. शाळेचा पहिला दिवस अविस्मरणीय करण्याच्या दृष्टीने शाळेने जय्यत तयारी केली होती. वर्गातही आकर्षक सजावट करण्यात आली होती.

संस्थेचे अध्यक्ष कुमार करजगी यांनी आपल्या भाषणातून उपस्थित विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन केले व शैक्षणिक वर्षाकरिता शुभेच्छाही दिल्या. शाळेच्या प्राचार्या सौ. रुपाली हजारे यांनी सर्व विद्यार्थी व पालकांचे स्वागत केले तसेच शाळेबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका सौ. प्रिसिला आसादे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
**सेक्स समस्या**
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
**डॉ.अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu )., P. G ( Sexology )
२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
**सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक**
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री २) आधार देणे, संयम ३) शिरा याच्यापासून बनवितात ४) मनाची स्थिती ५) उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या वडिलांचे नाव ६) पाण्याचे बाष्परूप ७) युध्दातील तोफवाहू वाहन ९) राजकारणात प्रवेश केलेला दाक्षिणात्य अभिनेता १२) कुर्त्याचा जोडीदार १४) शपथ (हिंदीत) १७) कालवणासाठी आवश्यक असणारा डोळ्यातून पाणी काढणारा १८) पटाईत,पारंगत २३) पैसे, अर्थ २५) वस्तूंची जुळवणूक २८) बंदूक (इंग्रजीत) २९) आधारित, एक शब्द-करार*** ३१) परत (हिंदीत) ३२) जंगली ३३) एक उद्योगपती-*** टाटा ३५) एक दिवंगत अभिनेत्री- ** लागू ३७) सरकार, सजा ४१) सहा दुणे ४२) जाड किंवा बारीक नसलेला सर्वसाधारण असा ४४) आकाश ४७) गोंधळ, गोंगाट ४८) पळभराचा काळ ५०) ईश्वर (उर्दू) ५१) थोरलाच्या विरूध्दार्थी ५२) एक जुने गीत- ** देवराया अंत आता पाहू ५४) शरीर ३६) बोली, वाचा, व्यापार करणारा

**आडवे शब्द :** १) महाराष्ट्रातील भाजपचे एक नेते ८) बे दुणे
१०) कर्नाटकातील एक जिल्हा ११) कोकणातील काटेरी मोठे फळ
१३) एक ज्वलनशील पदार्थ
१५) हसताना चेहऱ्याच्या या भागावर खळी पडते
१६) सचिन तेंडुलकरचे गुरू-**** आचरेकर १९) फळातील गोड द्रव
२०) उजवाच्या विरूध्दार्थी २१) दरवाजा, द्वार
२२) मोहाच्या पोळ्यातील गोड द्रव २४) सिल्व्हर (मराठीत)
२६) काळजी (इंग्रजीत) २७) बादशहाची पत्नी ३०) जुनाच्या विरूध्दार्थी
३२) अवजड ३४) कुटुंब ३६) एक उपदिशा ३८) मग्न, रममाण ३९) समुदाय, लोकांचा जमाव, एक शालेय विषय - ***शास्त्र ४०) तत्वांश, अर्क
४१) डोकेदुखीवर लावतात तो मलम ४३) ख्रिश्चन धर्मसेविका
४५) एक म्हण - ** वसे ते स्वप्नी दिसे
४६) नगरपालिका प्रमुख ४९) सुसाट असा वेग ५३) पाठीचा कणा याच्या साखळीने बनलेला असतो ५५) बगळा
५७) पश्चिम बंगालची राजधानी ५८) अवकाशात सोडले जाणारे अंतराळवाहन
५९) कागदांना जोडून ठेवणारी टोकदार पिन

## सुडोकु - 272

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 4 | 5 | 3 | 1 |
| 8 | 3 | 1 | | | 7 | 6 | | 9 |
| 5 | 4 | 9 | | | | 8 | | 7 |
| | 2 | | 5 | | 1 | | 7 | |
| 4 | 1 | | | | | 9 | 6 | |
| | 6 | 3 | | 2 | | | | |
| | | | | 3 | | 4 | 9 | 6 |
| | 9 | | 7 | 4 | | | 1 | |
| 2 | 8 | | | | 6 | 7 | | |

# भाजीपाला, फळे विक्रेते व फेरीवाला यांचा पालिका प्रशानाच्या विरोधात आक्रोश मोर्चा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात घोंगडे वस्ती, विजापूर वेस, विजापूर नाका, फॉरेस्ट, रेल्वे स्टेशन, नीलम नगर, जुना विडी घरकुल, विमानतळ, बाळीवेस, अशोक चौक अशा विविध ठिकाणी रस्त्यांवर किरकोळ भाजीपाला, फळे विक्रेते, चारचाकी फेरीवाले हे आपला स्वतःचा स्वयंरोजगार म्हणून भाजीपाला विक्री करतात. त्याचप्रमाणे सोलापूर शहरात तब्बल ४० वर्षापासून किरकोळ फळ विक्रेते, भाजी विक्रेते, चारचाकीवाले, फेरीवाले हे आपली रोजीरोटी व उदरनिर्वाहासाठी स्वयंरोजगार करत आहेत. यासाठी ७० फुट भाजी मंडई येथे रस्त्याच्या दुतर्फा फुटपाथवर बसून स्थिर अथवा फेरी करत भाजीपाला, फळे विक्री करत आहेत. यावर त्यांचे व त्यांचे कुटुंब आणि प्रपंच अवलंबून आहे. परंतु सोलापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून दर दोन-तीन महिन्याला एकदा त्यांच्यावर कारवाई होते. कारवाई दरम्यान त्यांनी उधार, उसने किंवा कृषी उत्पन्न समिती बाजारामधून कलम भरून आणलेला भाजीपाला, फळे व जीवनाश्यक वस्तू यांचे राजरोसपणे जागेवरच उध्वस्त केले जाते. कारवाईच्या नावाने जप्त केले जाते. त्यामुळे त यांच्यावर कजार्चा बोजा तर पडतोच मात्र त्या दिवशी कुटुंबासह उपासमारीची वेळ येते. प्रशासनाकडे याचना करूनही प्रशासन कांही ऐकत नाही. यामुळे त्यांच्यावर बारमाही अतिक्रमण विभागाची सक्रांत आहे. साहेब हातावरचे पोट असून आम्हाला जगू द्या, आमच्या पोटावर पाय देऊ नका. अन्यथा हि पोटातली आग डोक्यात जाईल. जर हा निर्णय नाही लागला तर ६ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशीनिमित्त मा. मुख्यमंत्री शासकीय पूजेनिमित्त पंढरपूर येथे येणार आहेत. त्यावेळी मा. मुख्यमंत्री यांना घेराव घालण्याचा इशारा ज्येष्ठनेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी जाहीर सभेत दिला.

बुधवार दि. ११ जून २०२५ रोजी लाल बावटा फेरीवाला चारचाकी व खोकेधारक श्रमिक संघटना सिटू सलंग्न च्यावतीने ७० फुट भाजी मंडई वरील विक्रेत्यांच्या अतिक्रमणा विरोधात ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर), माकपाचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख (मेजर) व संघटनेच्या



अध्यक्षा माजी नगरसेविका कॉ. नलिनीताई कलबुर्गी यांच्या नेतृत्वाखाली ७० फुट भाजी मंडई पासून ते संत तुकाराम चौक, पाथरूट चौक, पोटफाडी चौक, सिव्हील चौक, रंगभवन मार्गे, जिल्हा परिषद पूनम गेट येथे मोर्चा काढण्यात आला. या मोचार्चे जाहीर सभेत रुपांतर झाले. तद्पुर्वी ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त डॉ. मा. सचिन ओंबासे यांना शिष्टमंडळाद्वारे निवेदन देऊन भाजीपाला विक्रेत्यांच्या समस्यांसंबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चे अंती मा. आयुक्तांनी अल्पावधीतच संबंधित विभागांची बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेण्यासंबंधी आश्वासित केले. यावेळी शिष्टमंडळात माजी नगरसेविका नलिनीताई कलबुर्गी, खाजाभाई करजगी, ॲड अनिल वासम, रुक्मिणी कवळे,शांताबाई कोळी, चाँद शेख, जाफर शेख, सादिक बागवान, उर्मिला वाघमारे आदींची उपस्थिती होती.

यावेळी प्रास्ताविक करताना कॉ. युसुफ शेख म्हणाले कि, शहर फेरीवाला समिती व मंडई विभागाकडून झालेली कार्यवाही. (राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र अंतिम लाभार्थी निश्चित करणे. शासनाने उपविधी मंजूर करणे करिता सर्व महानगरपालिका यांना सूचित केले नूसार सोलापूर महानगरपालिका यांनी मा. सर्वसाधारण सभा ठराव. क्र. ८ दि. २०/०५/२००९ च्या मान्यतेने उपविधी लागू केलेला असून २००९ मध्ये गंडई विभागाकडून दिल्ली येथील एका संस्थेद्वारे फेरीवाले यांचे सर्व्हेक्षण करुन त्यांना ओळखपत्र देण्याची कार्यवाही करण्यात आलेली होती. तथापि ती पूर्ण होऊ शकली नाही. मंडई विभाग यांचे कडील उपलब्ध माहिती नुसार दि. १३/०५/२००९ रोजी मा. आयुक्त यांचे मान्यतेने मा. सर्वसाधारण सभा यांचेकडे राष्ट्रीय फेरीवाला तांत्रिक समिती त्वरित स्थापन करण्याबाबत पाठविलेल्या प्रस्तावास ठराव क्र. दि. २०/०५/२००९ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे. दि. २०/०६/२००९ चे मा. आयुक्त यांचे टिपणी नुसार जनतेकडून हरकती व शिफारशी मागविल्या असता हरकती व शिफारशी आल्या नसल्यामुळे सुनावणीची प्रक्रिया आवश्यक नाही व आदर्श उपविधीस मनपा ठराव क्र. १७९ दि.११/०२/२०१० रोजी मान्यता देण्यात आली. दि. ०७/०६/२०१४ च्या पत्राने मा. महाराष्ट्र शासन यांनी फेरीवाले धोरणाची त्वरित अंमलबजावणी करावी व शहर फेरीवाला समिती त्वरित स्थापन करण्यात यावी असे आदेश दिले. त्याप्रमाणे समिती गठीत करण्यात आली. मात्र अद्याप त्या समितीची एकही बैठक झालेली नाही. वास्तविक पाहता या संबंधी निर्णय घेण्याचे सर्व अधिकार समितीवर असताना अतिक्रमण विभागाने जाणीवपूर्वक हस्तक्षेप करून विक्रेत्यांना त्रास देत आहेत.

यावेळी संघटनेच्या अध्यक्षा कॉ. नलिनीताई कलबुर्गी यांनी आपला निर्णय लागेपर्यंत आपली एकजूट कायम ठेवावी, सरकार ऐकत नसेल तर आपणाला आंदोलनाच्या जोरावर आपल्या हक्काची ७० फुट भाजी मंडई मिळविण्यासाठी तुरुंगात जाण्याची तयारी ठेवा असे संबोधित केले.

यावेळी मंचावर विक्रम कलबुर्गी खाजाभाई करजगी, दाऊद शेख, दत्ता चव्हाण, अकील शेख आदींची उपस्थिती होती.

सदर मोर्चा यशस्वी करण्यासाठी, नरेश दुगाने,राजेश काशिद, विजय हरसूरे, जावेद सगरी, बजरंग गायकवाड, मोहन कोक्कुल, युसुफ शेख, हरीश पवार, अमीन शेख, प्रशांत चौगुले, प्रकाश कलबुर्गी सुजित गायकवाड, माजीद नदाफ, आदींनी परिश्रम घेतले.

# मराठा सेवा संघाचा विद्यार्थ्यांना मदतीचा हात

## जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. देशमुख; मराठा सेवा संघाच्या वतीने गुणवंतांचा गौरव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा सेवा संघ ही सेवाभावी संस्था बहुजन समाजाला सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी ३५ वर्षापासून कार्यरत आहे. महिला, विद्यार्थी, युवक अशा विविध घटकांना मदतीचा हात देते. संघाचे कार्य अलौकिक असल्याचे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. जी. के. देशमुख यांनी केले.शहर-जिल्ह्यातील दहावी व बारावी परीक्षेमध्ये यश संपादित केलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचा सत्कार मराठा सेवा संघाच्यावतीने झाला. व्ही. व्ही. पी.अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या गौरव सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. अरुण गायकवाड, सुनील कुलकर्णी, डॉ. जी. के. देशमुख,सदाशिव पवार, दत्ता मुळे, लक्ष्मण महाडिक, अंबादास सपकाळे, राम माने, अविनाश गोप, नवनाथ कदम आदी उपस्थित होते. दरवर्षी दहावी व बारावी विद्यार्थ्यांचा सत्कार करतो.पुढील शिक्षणाची दिशा ठरवण्यासाठी शिक्षणतज्ज्ञाचे मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करतो. याचा सर्व विद्यार्थ्यांनी फायदा घेण्याचे आवाहन देशमुख यांनी केले. 'दहावी व बारावीनंतरच्या शिक्षणाच्या विविध वाटा' या विषयावर डॉ. अरुण गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय भेटवस्तू देऊन सत्कार केला. सूत्रसंचालन प्रा. संतोष माने यांनी केले. आभार सदाशिव पवार यांनी मानले.

# आषाढी यात्रा बंदोबस्तात 'एआय' तंत्रज्ञानाचा करणार वापर

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी यात्रा बंदोबस्तासाठी यंदा पोलीस प्रशासन 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे. गर्दीवर नियंत्रण ठेवण्याबरोबरच चेंगराचेंगरी सारखे प्रकार यामुळे वेळीच रोखता येणार असून गुन्हेगारांवरही करडी नजर राहणार असल्याची माहिती सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी येथे दिली.वर्षभरातील सर्वात मोठा आषाढी यात्रेचा मुख्य सोहळा येत्या ६ जुलै रोजी साजरा होणार आहे. किमान १५ ते २० लाख भाविक वारकरी या सोहळ्याला हजेरी लावतील असा प्रशासनाचा अंदाज आहे. त्या दृष्टीने विविध शासकीय विभागांची तयारी सुरू आहे. त्याअनुषंगाने जिल्हा

पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांनी मंगळवारी येथे पत्रकारांशी संवाद साधत पोलीस प्रशासनाच्या तयारीची माहिती दिली. यावेळी उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, शहर पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके प्रमुख उपस्थित होते.कुलकर्णी म्हणाले, आषाढी यात्रा काळात श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंधरा लाखाहून अधिक भाविक दाखल होणार आहेत.

चंद्रभागा वाळवंट, मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग,दर्शन मंडप, बसस्थानक,



रेल्वे स्टेशन आदी ठिकाणी भाविकांची मोठी गर्दी होते. भाविकांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी व भाविकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. एआय तंत्रज्ञानामुळे कोणत्या भागात किती भाविक आहेत, गदीर्ची घनता किती आहे ? याची माहिती पोलीस प्रशासनाला मिळत राहणार आहे. त्यामुळे चेंगराचेंगरी सारख्या दुर्घटना टाळण्यासाठी वेळीच उपायोजना करता येतील. तसेच दहा ड्रोन कॅमेराद्वारे निगराणी करण्यात येणार आहे. त्या माध्यमातून त्या त्या भागात सूचना दिल्या जातील. या तंत्रज्ञानामुळे यंदा यात्रेत भाविकांची संख्या मोजली जाणार आहे. नेमका अचूक आकडा समजणार नाही मात्र ७० ते ८० टक्के बरोबर संख्या समजणार आहे, असेही कुलकर्णी यांनी सांगितले.

### २५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

शहरात अडीचशे सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले आहेत. त्यालाही एआय तंत्रज्ञानाची जोड दिली जाणार आहेत. पोलीस रेकॉर्डला विविध भागातील चोरटे व गुन्हेगारांचे फोटो असतात. ते या तंत्रज्ञानाद्वारे अपलोड केले जातील. गर्दीत ज्या ज्या ठिकाणी संबंधित चेहरे कॅमेऱ्यांमध्ये आढळून येतील, त्यावेळेस पोलिसांना अलर्ट मिळेल. त्यानुसार तात्काळ कारवाई करता येईल, असेही पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले.

# परिवहन मंत्र्यांची महामार्गावरील हॉटेल थांब्यांना अचानक भेट

**भिगवण (कटूसत्य वृत्त):-** परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक पंढरपूर दौऱ्यावर असताना पुणे -सोलापूर महामार्गावरील एसटीच्या अधिकृत हॉटेल थांब्यांना अचानक भेट दिली. तेथील प्रवासी व एसटी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला त्यांना मिळणारे अन्नपदार्थ ताजे आहेत का, अन्नपदार्थ वाजवी दरात मिळतात का, तसेच महामंडळाची नाश्ता योजना चालू आहे का याची चौकशी केली. याबरोबरच तेथील प्रसाधनगृहाची देखील त्यांनी आवर्जून पाहणी केली. यावेळी महिला प्रवाशांनी प्रसाधनगृहाच्या



अस्वच्छते बाबत तक्रार नोंदवली. त्याची तातडीने दखल घेत मंत्री सरनाईक यांनी सदर प्रसाधनगृहे तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश संबंधित हॉटेल मालकाला दिले. तसेच आढळलेल्या इतर त्रुटी बाबत संबंधित मालकाला विहीत वेळेत त्या दूर करण्याचे निर्देश दिले. अन्यथा सदर हॉटेल थांबा नाईलाजाने रद्द करण्याचे निर्देश देऊ, असे सांगितले. दरम्यान हे हॉटेल थांबे ज्या पुणे विभागात येतात त्या विभाग नियंत्रक यांना संपर्क साधून या हॉटेल थांब्यांच्या त्रुटीची पूर्तता पुढील एक महिन्यात करण्याचे निर्देश दिले.

### अनाधिकृत हॉटेल थांब्यावर एसटी बस थांबवणाऱ्या चालक- वाहकांवर कारवाई

दरम्यान भिगवन जवळील एका अनधिकृत हॉटेल थांब्यावर एसटी च्या अनेक बसेस थांबलेल्या परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तेथे भेट देऊन पाहणी केले असता, अत्यंत अस्वच्छ वातावरणात प्रवाशांना जेवण वाढले जात असल्याचे त्यांना दिसून आले. याबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करून संबंधितांवर कडक कारवाई करावी. असे एसटीच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

### भिगवणला लवकरच नवे बसस्थानक होणार

परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक हे पंढरपूर दौऱ्यावर असताना महामार्गावरील भिगवन बसस्थानकाला त्यांनी भेट दिली. तेथील असुविधा बाबत स्थानिक रहिवाशांनी मंत्री सरनाईक यांच्या कडे कैफियत मांडली. महामागार्मुळे सदर बसस्थानक सखल भागात गेल्याने पावसाळ्यात पाणी साचून अत्यंत गैरसोय होते. तसेच येथील सध्या वापरात असलेले प्रसाधनगृहे देखील अत्यंत तकलादू व अस्वच्छ असतात, अशा तक्रार स्थानिक रहिवाशांनी केली. याबाबत महामंडळाच्या बांधकाम विभागाचे महाव्यवस्थापक दिनेश महाजन यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून नव्या प्रशस्त भिगवन बसस्थानकाची निविदा लवकरात लवकर प्रसिद्ध करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. त्यामुळे भिगवन येथे नवे बस स्थानक लवकरच आकाराला येईल असा आशावाद येथील रहिवाशांच्या मध्ये निर्माण झाला आहे.

# आता तीन महिन्यांचे रेशन एकदाच

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पावसाळ्याच्या कालावधीत अतिवृष्टी, पूर किंवा रस्ते बंद होण्यासारख्या परिस्थितीमुळे रेशन दुकानांपर्यंत पोहोचणे लाभार्थ्यांसाठी कठीण होऊ शकते. विशेषतः ग्रामीण भागातील गोरगरीब आणि अंत्योदय लाभार्थ्यांना धान्य मिळवण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. यावर उपाय म्हणून शासनाने जून, जुलै आणि ऑगस्ट या तीन महिन्यांचे रेशन एकदाच वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे लाभार्थ्यांना वारंवार रेशन दुकानांवर जाण्याची गरज भासणार नाही आणि पावसाळ्यातील अडचणी टाळता येतील. सध्या सोलापूर जिल्ह्यातील कार्डधारकांना जून व जुलै महिन्याचे धान्य वाटले जात आहे. ऑगस्ट महिन्याचे धान्य नियोजनानुसार वाटण्यात येईल. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात चार लाख ९६ हजार ३०३ इतके अन्न सुरक्षा तर ५७ हजार ३२५ इतके अंत्योदय शिधापत्रिकाधारक आहेत. सध्या देशातील सुमारे ८० पावसाळ्यामुळे उपाययोजना, 'पुरवठा' कडून अंमलबजावणी कोटी लोकांना दरमहा पाच किलो तांदूळ किंवा गहू मोफत दिले जाते.अंत्योदय अन्न योजनाअंतर्गत अधिक गरजूंना दरमहा ३५ किलो धान्य पुरवले जाते. मात्र, मान्सूनमध्ये पुरवठा साखळी खंडित होण्याची शक्यता लक्षात घेऊन सरकारने हे धान्य आगाऊ देण्याचा निर्णय घेतला आहे. अन्न



सुरक्षा कुटुंबांतर्गत प्रत्येक व्यक्तीला तीन महिन्यांसाठी १५ किलो धान्य तर अंत्योदय कार्डधारकांना एका तीन महिन्यांच्या रेशनसाठी तीनवेळा बायोमेट्रिक तपासणी करावी लागेल. मान्सून काळात उपासमारीसारख्या समस्यांपासून गरीब कुटुंबांना वाचवण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे.मात्र, लाभ घेण्यासाठी वेळेत ई-केवायसी पूर्ण करणे आणि आधार लिंकिंग करणे अत्यावश्यक आहे. यामुळे गरिबांना आवश्यक रेशन मिळवण्यासाठी अटी काय ? शहर व जिल्ह्यातील कार्डधारकांना तीन महिन्यांचे रेशनमधून धान्य एकाचवेळी देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. दरम्यान, मोफत धान्य घेण्यासाठी रेशन कार्ड सर्व सदस्यांच्या आधार कार्डशी लिंक असणे बंधनकारक आहे. ई-केवायसी पूर्ण करणे गरजेचे आहे. आधार आधारित बायोमेट्रिक सत्यापन अनिवार्य असून ते ३० जून २०२५ पर्यंत पूर्ण केलेले असावेत, असे रेशन दुकानदार संघटनेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष सुनील पेंटर यांनी सांगितले.कुटुंबाला १०५ किलो धान्य दिले जाईल.त्यावेळी अन्नसुरक्षा मिळेल आणि रेशनच्या तक्रारीही कमी होतील.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.क.अर्ज क्र:३७५/२०२५ नि.०६

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर मा. एस. बी नवले सो. यांचे कोर्टात**

१) रविंद्र हिराचंद साने वय ६१ वर्षे, धंदा- कांही नाही,
२) अर्पण रविंद्र साने वय- २६ वर्षे, धंदा- शिक्षण,
दोघे रा. ७३/५ सिद्धार्थ हौसिंग सोसायटी जवळ
उत्तर सदर बझार, सोलापूर } अर्जदार

**विरुध्द**

प्रशासकीय अधिकारी,
श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर } सामनेवाला

ज्याअर्थी, अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारसा दाखला मिळणेकरिता दाखल केलेला आहे. यातील अर्जदार नं.१ यांची धर्मपत्नी व अर्जदार नं. २ यांची जनक माता नामे अंजली रविंद्र साने ही होती. सदरहु अर्जदार नं.१ यांची धर्मपत्नी व अर्जदार नं. २ यांची जनक माता नाम अंजली रविंद्र साने हिचे दिनांक ०५/०९/२०२४ रोजी डयुटीवर कार्यरत असतानाच हृदय विकाराचा झटका आल्याने निधन झाले आहे. त्यांच्या मृत्युपश्चात अर्जदार नं. १ व २ हे कायदेशीर वारसदार आहेत.

अर्जदार नं. २ यांना मयत अंजली रविंद्र साने यांचे मृत्यु पश्चात सामनेवाला यांचेकडे अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेकरिता अर्ज दिला असता, सदरचे सामनेवाले यांनी त्यांचेकडील पत्र क्र. श्रीछशिमसरुसो/आस्था/ शुश्रूषा / श्री साने (मयत)/अधिपरि/२८९८-९९/२५ दि. २५/०३/२०२५ रोजीचे पत्रान्वये ''आपणांस सुचित करण्यात येते की, दिनांक ०६/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये वेतन देयक शुश्रुषा विभागाकडून श्रीमती अंजली रविंद्र साने (मयत) अधिपरिचारिका यांचे नामनिर्देशित वारसदार व कायदेशीर वारसदार कोण आहेत. याबाबतचे नामनिर्देशित आदेश विभागाकडे सादर करण्याबाबत कळविले आहे. तरी आपण लवकरात लवकर कायदेशीर वारसदार असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल असे लेखी स्वरुपात वारसा दाखला आणणेबाबत कळविले. त्यामुळे अर्जदारांनी वारसा दाखला मिळणेकामी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार यांच्या नावाने वारसा दाखला देण्यासंबंधी कांही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख १५/७/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहावे. तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नावाने वारस प्रमाणपत्रास कोणाची कांही हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.
ही जाहीर नोटीस माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्यानिशी दिली असे.
ता.१२/०६/२०२५

(लिपिक) (शिक्का)

हुकूमावरून
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश व. स्तर सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.क.अर्ज क्र:२१०/२०२५ नि.

**सोलापूर येथील मे. ८ वे दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर (एस.बी. नवले साहेब) यांचे कोर्टात...**

१) पार्वती राजू कल्याणकर वय ७५ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. ५५/६२, शाहीर वस्ती, भवानी पेठ, सोलापूर-४१३००२
२) संगीता अंबऋषी आगलावे वय ५५ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. २८८, बार्शी रोड, बाभुळगांव, नागोबा मंदिराजवळ,
आगळगांव - ४१३४०९
३)मंगल शिवाजी गुरव वय ५७ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. मु.पो. कौठाळी, नान्नज, ता.उ. सोलापूर, जि. सोलापूर - ४१३२२२ } अर्जदार
४)इंदु भास्कर डांगे वय ४१ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. मु.पो. सुर्डी, ता. बार्शी, जि. सोलापूर -- ४१३४०१
५)प्रियंका विनायक गुरव वय ५७ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. मेंढापूरकर, सोलापूर-४१३३०४
६)दिपाली सिध्देश्वर गुरव वय ४२ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. नितळी, जि. उस्मानाबाद -४१३५०९
७)रामचंद्र चांगदेव गुरव वय ३७ वर्षे, धंदा - कामगार,
रा. बीबी दारफळ, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर - ४१३२२२

**विरुध्द**

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी, अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारसा दाखला मिळणेकरिता दाखल केलेला आहे. हिराबाई चांगदेव गुरव यांचे दि. ०७/०७/२०२३ रोजी मौजे बी बी दारफळ, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर येथील राहत्या घरी निधन झाले आहेत. तसेच मयत हिराबाई चांगदेव गुरव हिचे पती व अर्जदार नं. १ ते ७ यांचे जनक पिता नामे चांगदेव गेनदेव गुरव यांचे दि. २९/०४/२०१९ रोजी मौजे बी बी दारफळ, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर येथे निधन झाले आहेत.

मयत हिराबाई चांगदेव गुरव व चांगदेव गेनदेव गुरव यांना मृत्युपश्चात यातील अर्जदार नं. १ ते ७ हे कायदेशीर वारसदार आहेत. हिराबाई चांगदेव गुरव ही अर्जदार नं. १ ते ७ यांची जनक आई होती तर चांगदेव गेनदेव गुरव हे अर्जदार नं. १ ते ७ यांचे जनक पिता होते. यातील अर्जदार नं. १ ते ६ हे मयतांची मुली असून, अर्जदार नं. ७ हा मयताचा मुलगा आहे..

मयत हिराबाई चांगदेव गुरव अर्जदार यांचेशिवाय दुसरा कायदेशीर वारस किंवा प्रतिनिधी नाही. वरील सर्व अर्जदार हे मृत व्यक्तीचे वर्ग-१ कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी मे. न्यायालयाकडून वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार यांच्या नावाने वारसा दाखला देण्यासंबंधी कांही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख १४/०७/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहावे. तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नावाने वारस प्रमाणपत्रास कोणाची कांही हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.
ही जाहीर नोटीस माझ्या सहीनिशी व मे. कोर्टाच्या शिक्यानिशी दिली असे.
ता. १२/०६/२०२५

(लिपिक) (शिक्का)

हुकूमावरून
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश व. स्तर सोलापूर

